


दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

▪ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ▪




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १४६ •मंगळवार, दि. २६ ऑगस्ट २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

## "आई" हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आलेल्या महिलेचा मृत्यू; डॉक्टरावर कारवाईची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

मांजरसुंबा येथील एक महिला उपचारासाठी बीडच्या आई हॉस्पिटलमध्ये आज सकाळी आली असता डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे सदरील महिलेचा दुर्देवी मृत्यू झाला. केवळ आई हॉस्पिटलच्या दुर्लक्षपणामुळे आणि डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच महिलेचा मृत्यू.झाला असून दोषींवर कारवाई करण्याची मागणी

- दोन तास आत ठेवून घेतल्यानंतर दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये केले रेफर
- आई हॉस्पीटलमधील चुकीच्या ट्रिटमेंटमुळेच मृत्यू झाल्याचा नातेवाईकांचा आरोप
- नातेवाईक आक्रमक, महिलेचा मृतदेह एसपी ऑफीससमोर आणून ठेवला

नातेवाईकांनी केली आहे.

मांजरसुंबा येथील नाझमीन शकील सय्यद वय २१ वर्ष या महिलेला आईव्हीएफ करण्यासाठी बीड येथील आई हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. यावेळी डॉक्टरांकडून मोठा हलगर्जीपणा झाला. विशेष म्हणजे या हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभाग नसल्याचे सांगण्यात येते. महिलेची प्रकृती बिघडल्यानंतर डॉक्टरांकडून सारवासारव करण्याचा प्रयत्न झाला. मात्र आई हॉस्पिटलमध्ये नाझमीन यांचा दुर्देवी मृत्यू झाला.त्यानंतर त्या महिलेला बीडच्या दीप हॉस्पिटलमध्ये आई हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाने दाखल केले. मात्र ती आधीच मृत्यू पावल्याचे लक्षात आल्यानंतर नातेवाईकांनी आई हॉस्पिटल व्यवस्थापन आणि डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचे सांगत मृतदेह



घेऊन पोलीस अधीक्षक कार्यालय गाठले. या ठिकाणी नातेवाईकांनी ठिय्या आंदोलन करून डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी केली. दरम्यान पोलिसांनी शवविच्छेदन केल्यानंतर प्राप्त अहवालानुसार कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिले. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## अखेर वाढीव टप्पा अनुदानाचा शासनादेश निर्गमित

### विना अनुदानित शाळा कृती समिती बीड जिल्ह्याच्या वतीने शासनाचे आभार

**बीड । प्रतिनिधी**

राज्य शासनाने राज्यातील विना अनुदानित शाळांना वाढीव टप्पा अनुदान पावसाळी अधिवेशनात मंजूर केल्यानंतर त्या संदर्भातला शासनादेश अखेर आज सोमवार दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ७:३६ सुमारास निर्गमित करून विना अनुदानित शाळेच्या वाढीव टप्पा अनुदानाच्या प्रश्न मार्गी लागला. त्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार, दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांचे विनाअनुदानित शाळा कृती समिती बीड जिल्हा शाखेच्या वतीने वैजनाथ चाटे, जितेंद्र डोंगरे, जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांनी जाहीर आभार मानले. राज्यातील विना अनुदानित शाळांना वाढीव टप्पा अनुदान मिळावे या मागणीसाठी सातत्याने शिक्षक संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येत होते. आंदोलनाच्या मागणीचा पाठपुरावा करत असताना ८ आणि ९ जुलै रोजी शिक्षक समन्वय संघाच्या वतीने मुंबईतील ▶▶ उर्वरित पान २ वर

## गेवराईत 'लक्ष्मण हाके'च्या गाडीवर दगडफेक; पुतळा जाळला

**गेवराई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार विजय राजे पंडीत आणि ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके यांच्या समर्थकांनी समोरासमोर येऊन एकमेका विरूद्ध घोषणाबाजी केल्याने, गेवराई शहरातील छत्रपती शिवाजी चौकात तणाव निर्माण झाला. हा सगळा गोंधळ सोमवार ता. २५ रोजी साडेचार वाजता अचानक घडल्याने पोलीसांची दमछाक झाली. दरम्यान, दोन्ही गटाला पोलीसांनी बाजुला केल्याने अनर्थ टळला गेला.



दोन दिवसांपापूर्वी प्रा. हाके यांनी आमदार पंडीत यांच्यावर टिका केली होती. त्यानंतर, दोन्ही गटात सोशल नेटवर्किंग साईटवर शाब्दिक हल्ले करण्यात आले होते. रविवार ता.२४ रोजी शास्त्री चौकात आ. पंडीत समर्थकांनी हाके यांचा पुतळा जाळून निषेध केला. सोमवारी काळे नावाच्या युवा नेत्याला गेवराई पोलीसांनी ताब्यात घेतल्याने पून्हा वाद झाला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी गेवराई पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन करून, गजानन काळे यांना सोडण्याची मागणी केली. त्यानंतर काही वेळाने स्वतः प्रा. हाके यांचा ताफा गेवराईच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## माजलगाव मध्ये इम्तियाज जलील नावाचे वादळ

### बीडच्या जनतेची आशीर्वाद आणि साथ दिली तर अॅड शेख शफीक भाऊ होणार नगराध्यक्ष: मा खा इम्तियाज जलील

**माजलगाव । प्रतिनिधी**

ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएमआयएम) पक्षाच्या माजलगाव येथील जाहीर सभेत पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा माजी खासदार इम्तियाज जलील यांनी सामाजिक एकता आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी जोरदार आवाज उठवला. या सभेत त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीत पक्षाच्या नियोजनबद्ध रणनीती आणि भ्रष्ट व्यवस्थेला उखडून टाकण्याच्या

▶▶ उर्वरित पान २ वर



**• माजलगावात ऐतिहासिक घोषणा**

**हजारो जनसमुदायाच्या उपस्थितीत खचखच् नेते इम्तियाज जलील यांनी महाराष्ट्रातील पहिल्या AIMIM नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराची अप्रत्यक्ष घोषणा केली. सर्वांनी साथ दिली तर बीडचा नगराध्यक्ष शफीक भाऊ, असे जलील यांनी जाहीर केले, ज्यामुळे उपस्थितांमध्ये उत्साह संचारला.**

## तलवाड्यात मनोरंजनार्थ कल्बच्या नावाखाली नागरिक व्यासांधिन घरा घरात अर्थिक चणचणी वाढल्या

### जिल्हा पोलीस आधिक्षकांच्या पोलीस प्रशासनातील हाप्तेखाऊवृती महिला वर्गाच्या शापला कारणीभूत ठरणार

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस ठाणे सातत्याने अवैध वाळू उपसा व विक्री व्यावसायमुळे पोलीसांच्या अर्थिक ऊलाढालीचे मुख्य स्त्रोत आसल्याचे प्रामुख्याने बोलल्या जात असुन. गुटखा, मटका, गांजा, अवैध देशी-विदेशी हातभट्टी, ताडी सारखे आणेक समाजविघातक व्यावसाय पोलीस प्रशासनाच्या आशिर्वादाने चालत आसल्याचा सुर सातत्याने ऐकावयास मिळत आसतांना आता मनोरंजनार्थ कल्बच्या नावाखाली कायद्यातील पळवाटाचा मार्ग अवलंबित कल्ब चालक व पोलीस प्रशासन स्वताहचे चांगभलं करुन घेण्याच्या नादात तलवाडा व



तलवाडा परिसरातील घरा घरात कलह निर्माण करत आसल्याचे बोलल्या जात असुन आणेक कुटुंबात या मनोरंजनार्थ कल्बच्या अहारी गेलेल्या नागरिकांच्या परिवारात अर्थिक चणचणी भासु लागल्याचे चित्र या निमित्ताने निदर्शनास येत असुन आणेक सामाजिक संघटना पारिवारीक मंडळी हे अवैध व्यावसाय बंद करण्याच्या मनस्थितित आसतांना तसे प्रयत्न देखील होत आसतांना पोलीस प्रशासन स्तरावर अर्थिक मलिदा मिळतो म्हणून हे व्यावसाय कायदेशीर कसे नियमाकुलीत आहेत हे भासवण्याचा प्रयत्ण होत आसल्याचे या ठिकाणी दिसुन येत आहे. मनोरंजनार्थ कल्ब हे कायदेशीर आसेल तर पोलीस प्रशासनाला हप्ते कशाला ? आसा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत असून प्रतेक अवैध व्यावसायला वैध दाखवण्याचा किंवा ठरवण्याचा खटाटोप पोलीस प्रशासनातील पदाधिकारी मोठ्या प्रमाणात

▶▶ उर्वरित पान २ वर

## २९ ऑगस्ट चलो मुंबई मराठा आरक्षणाची आरपारची लढाई

### मराठा बांधवांनी लाखोच्या संख्येने सहभागी व्हावे: राजेंद्र मस्के



**बीड । प्रतिनिधी**

गेली ४० वर्षापासून मराठा आरक्षणाचा लढा चालू आहे. राजकीय हेतूने प्रेरित होऊन शासनकर्ते मराठा आरक्षणाकडे दुर्लक्ष करत आले आहेत. ओबीसी मधून मराठा बांधवांना आरक्षण मिळाले पाहिजे, यासाठी मराठा संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील दोन वर्षापासून सातत्याने संघर्ष करत आहेत.

राज्यात बहुसंख्येने असणारा मराठा समाजाचा विकास खुंटला असून समाजातील तरुणांचे भवितव्य अधांतरी लटकले आहे. दारिद्र्य व आर्थिक संकटात अडकलेल्या मराठा समाजाला उन्नतीच्या मार्गावर जाण्यासाठी आरक्षणाची गरज आहे. प्रगतीच्या मुख्य प्रवाहात मराठा समाजाला स्थान मिळाले पाहिजे. न्याय मागणीसाठी दिनांक २९ऑगस्ट २०२५ रोजी आझाद मैदान मुंबई येथे मनोज दादा जरांगे पाटील उपस्थितीत आंदोलन होणार आहे. भावी पिढीच्या भवितव्या साठी मराठा बांधवांनी लाखोच्या संख्येने या लढ्यात सहभागी व्हावे. असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी डोंगर पाटोदा ता. बीड येथील अखंड हरिनाम सप्ताह सांगता प्रसंगी उपस्थित भाविक भक्तांसी ▶▶ उर्वरित पान २ वर

संकल्प मेळाव्याच्या माध्यमातून पप्पू कागदे यांनी केला दीपक कांबळे यांना जिल्हा परिषद निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्याचा संकल्प

## लोकांची सेवा करणाऱ्यांना संधी मिळायला हवी : पप्पू कागदे

**• केज येथील रिपाईंच्या संकल्प मेळाव्याच्या माध्यमातून पप्पू कागदे यांनी फुंकले स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे रणशिंग**





**केज । प्रतिनिधी**


निळ्या झेंड्याखाली शोषित पीडित लोकांची सेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी द्यायला हवी. केंद्रिय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली चळवळीत काम करणारा कार्यकर्ता हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी बांधिलकी जपणारा कार्यकर्ता आहे. म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत दीपक कांबळे यांच्या उमेदवारीवर पप्पू कागदे यांनी जणू शिक्का मोर्तब करून स्थानिक स्वराज्य संस्थेचे रणशिंग फुंकले. तसेच यावेळी मेळाव्याचे संयोजक दीपक कांबळेंनी यांनी यावेळी सांगितले की, केंद्रीय मंत्री रामदास आठवले आणि पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली बहुजन समाजाला सोबत घेऊन सामाजिक अभिसरण सुदृढ करण्याची प्रक्रिया आणि सामाजिक चळवळ गतिमान कर कार्यकर्ते सोबत घेऊन आम्ही त्यांच्या मूलभूत हक्कासाठी लढत आहोत. दि. २५ ऑगस्ट रोजी केज रिपाइंचे वतीने दीपक कांबळे यांनी केज येथील मुक्ताई लॉन्स येथे संकल्प मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला मराठवाडा संघटक मजहर खान, मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे, जिल्हा सल्लागार उत्तम मस्के, प्रभाकर चांदणे, दशरथ सोनवणे, कपिल कागदे, रवींद्र जोगदंड, विकास मस्के, ▶▶ उर्वरित पान २ वर



# नवगण राजुरी : श्री गणेशाचे पौराणिक महात्म्य असलेले पवित्र ठिकाण

## ●रामायणाचा संबंध असलेला – नऊ गणेश मंदिरे असलेला परिसर

नवगण राजुरी या गावाच्या पंचक्रोशीत नवगण म्हणजेच नऊ गणपतीची स्थाने आहेत. त्यामुळे या गणपतीस नवगण व गावास नवगण राजुरी या नावाने मराठवाड्यात ओळखले जाते . या गणपती मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे चार दिशेला चार गणेश मूर्ती एकाच ठिकाणी एका दगडावर पाहायला मिळतात . पूर्व, पश्चिम , दक्षिण आणि उत्तर या चार दिशेला चार गणपतीची रुपे एकाच शिळेवर एकत्र आहेत . पूर्वेकडे मुख असलेला ' महामंगल ' , पश्चिमाभिमुख ' शेषाब्धिष्ठित ' , दक्षिणाभिमुख ' मयूरेश्वर ' आणि उत्तराभिमुख ' उतीष्ट ' हे चार गणपती . या मूर्ती वेगवेगळ्या आसनात अंदाजे पावणेचार फूट उंचीच्या आहेत . हे मंदिर पेशवेकालीन असून मंदिरात पाच व गावाच्या चार वेशींवर चार गणपती आहेत . त्यामुळे या स्थानाला नवगण राजुरी म्हणतात , अशी आख्यायिका सांगितली जाते . या पद्धतीने एकाच ठिकाणी गणेशाची चार रुपे एकाच दगडात साकारलेले गणेशस्थान भारतात दुसरीकडे नाही . या चार दिशेच्या गणेशाचे दर्शन चारी दिशेने घेता येते . पाचवी मूर्ती गाभाऱ्यात आहे. त्रेतायुगातल्या रामायणकाळापासून गणेश उपासनेचे महत्त्व अधोरेखित केले गेलेले दिसते . रामायणात असं वर्णन आहे की , रावणाने सीतेचं अपहरण केल्यानंतर प्रभू श्रीरामांनी सीतेचा शोध घेण्यासाठी प्रवास सुरू केला आणि दक्षिण दिशेस प्रस्थान करताना त्यांनी प्रथम गणेशाची पूजा केली . राजुरी इथे गणेशपूजनाचा ऐतिहासिक संदर्भ सापडतो . रामायणकाळातच नवगण गणेशाची उपासना येथे झाली असल्याने या ठिकाणाला 'नवगण राजुरी' अशी ख्याती प्राप्त झाली . राजुरीतील नवगण गणेश मंदिर हे अत्यंत प्राचीन व ऐतिहासिक मंदिर आहे. मंदिर परिसरात आजही जुन्या काळातील वास्तुशिल्प व परंपरांचे दर्शन घडते . येथे दरवर्षी गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा होतो . भाद्रपद शुद्ध प्रतिपदेपासून



ते अष्टमीपर्यंत चालणाऱ्या उत्सवात यात्रेचे स्वरूप लाभते . यात्रेच्या काळात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी जमते . भजन , कीर्तन , सामूहिक आरत्या यामुळे संपूर्ण परिसर भक्तिभावाने भरून जातो . शेजारीच असलेल्या संगमेश्वर येथील बालयोगी श्री भगवान महाराज – लहान वयातच शिवोपासक – व्रतस्थ जीवन स्वीकारून त्यांनी हिमालय , हरिद्वार , गंगोत्री – गौमुख आदी उत्तरभारतातील तीर्थक्षेत्री कडक तपश्चर्या केली . वृक्षछायेखाली , कुटीरांमध्ये , तसेच नदीनिकटी दीर्घकाळ आसनस्थ राहून नामस्मरण व जपसाधना केली . बीड जिल्ह्यातील या गणेश क्षेत्री त्यांनी दीर्घकाळ वास्तव्य करून नित्यपूजा , शिबिरे , अध्यात्म–प्रबोधन आणि देवस्थान–विकास यांची उभारणी केली . संगमेश्वर परिसरातील मंदिररचना २००६ मध्ये प्रारंभ झाली . उपरोल्लीखित नवगण राजुरी व्यतिरिक्त बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी गणेश मंदिरे आहेत , ज्यांना ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व आहे . आष्टी तालुक्यातील चिंतामणी गणेश , अंबाजोगाईतील संगेश्वर मंदिर परिसरातील गणेश , गेवराई व माजलगाव भागातील प्राचीन गणेश मंदिर ही त्यातील काही महत्त्वाची स्थळं आहेत . या सर्व मंदिरांच्या उत्पत्तीच्या कथा लोककथांमध्ये वाड्मयात सापडतात . याशिवाय बीड जिल्ह्यातील परळीतील वैद्यनाथ मंदिर , अंबाजोगाईतील योगेश्वरी देवी , पाटोदा व धारूर येथील विविध प्राचीन जत्रा स्थळे हे धार्मिक पर्यटनासाठी समृद्ध वारसा जपणारे केंद्र आहेत. पर्यटन वाढीसाठी या धार्मिक स्थळांना एकमेकांशी जोडणारी धार्मिक पर्यटन सर्किट योजना राबवता येईल . स्थानिक वाहतूक व्यवस्था सुधारली , स्वच्छता , निवास व्यवस्था व माहिती केंद्रे उपलब्ध झाली तर भाविकांना व पर्यटकांना सोय होईल . श्री गणेशाविषयी महाराष्ट्राच्या लोकजीवनात विशेष भाव आहे. संत साहित्यापासून ते अभंगांमध्ये गणेशाचे महत्त्व दिसते . नवगण रूप धरण्या कारण , दैत्याचे हरण करावया अशा ओव्यांमधून भक्तीभाव प्रकट होतो . मराठी चित्रपटसृष्टीतही गणेशाला विशेष स्थान मिळालेले आहे . सुखकर्ता दुखहर्ता ही आरती किंवा गणपतीबाप्पा मोरयाच्या गजराशिवाय गणेशोत्सवाची कल्पनाही अशक्य आहे . चित्रपटातील देवा हो देवा गणपती देवा सारखी गाणी आजही प्रत्येक घराघरात गणेशोत्सवात गुंजतात . नवगण राजुरी , चिंतामणी गणेश , अंबाजोगाईचा संगेश्वर , तसेच इतर अनेक गणेश मंदिरे ही केवळ धार्मिक श्रद्धेची केंद्रे नाहीत , तर बीड जिल्ह्याच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक वैभवाची साक्ष देणारी ठिकाणे आहेत . पर्यटन , इतिहास , श्रद्धा आणि संस्कृती यांचा संगम जिथे घडतो ती स्थळे फक्त जिल्ह्यापुरती मर्यादित राहत नाहीत , तर राज्याच्या व देशाच्या धार्मिक नकाशावर महत्त्वाचे स्थान मिळवतात . गणेश उपासना ही भक्तांच्या जीवनातील दुःख दूर करणारी , आनंदाचा मार्ग दाखवणारी व समाजाला एकत्र आणणारी शक्ती आहे . अशा या नवगण राजुरीसारख्या पवित्र स्थळांचा योग्य सन्मान , प्रसिद्धी आणि जतन झाले , तर बीड जिल्हा धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाचे एक महत्त्वाचे केंद्र बनू शकेल .

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके, तहसीलदार बीड**

◆ पान १ वरून पुढे...

## अखेर वाढीव....

आझाद मैदानात मोठे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आंदोलनाची दखल घेतली. तसेच सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनामध्येच वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करून असे आश्वासन दिले. नुसता आश्वासन देऊन मुख्यमंत्री थांबले नाहीत तर मुख्यमंत्र्यांनी दुसऱ्याच दिवशी म्हणजेच ९ जुलै रोजी वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या निधीची घोषणा केली. केवळ घोषणा करून सरकार थांबले नाही. तर यावेळी वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या ९७० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली. शिवाय ०१ ऑगस्ट २०२५ रोजी पासून प्रत्येक शिक्षकांच्या खात्यात वाढीव टप्प्याचा पगार देणार असल्याचे आश्वासन दिले. परंतु अधिवेशन संपून महिना दीड महिना झाला तरी शासन आदेश निर्गमित झाला होत नसल्याने शिक्षण समन्वय संघाच्या वतीने मंत्रालय स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला. 'बोले तैसे चाले' या म्हणीप्रमाणे राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार, दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी शासनादेश निर्गमित करण्यासंदर्भात प्रशासनाला आदेश दिले. त्यानंतर शासन आदेश निर्गमित करण्यासाठी हालचाली सुरू केल्या. अखेर आज सोमवार दिनांक २५ रोजी सायंकाळी ७:३६ वाजण्याच्या सुमारास वाढीव टप्पा अनुदानाचा शासन आदेश निर्गमित केला. शासन आदेश निर्गमित होताच महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समिती बीड जिल्हा शाखेच्या वैजिनाथ चाटे, जितेंद्र डोंगरे, लक्ष्मण जगताप, विजयसिंह शिंदे, मुक्ताताई मोटे–अर्दड मॅडम, बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, रामदास जामकर, शेख सर,बाळासाहेब नागरगोजे, रवींद्र भुक्कन, जावेद पठाण, दिपक गरुड, चंद्रशेखर तौर, अंकुश गवळी, प्रताप पवार, भागवत यादव, अशोक मोरे, सुरेश कदम यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी वतीने आनंद साजरा करून शासनाचे आभार मानले.

## गेवराईत 'लक्ष्मण...

दिशेने आल्याने, दोन्ही गट समोरासमोर आले. एकमेकांवर धाऊन जाण्याचा प्रयत्न झाला. एकमेका विरूद्ध घोषणाबाजी झाल्याने, तणाव निर्माण झाला. अज्ञातांनी हाके यांच्या गाडीच्या दिशेने दगडफेक केल्याने, तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. दरम्यान, आमदार विजयसिंह पंडित आणि आमदार प्रकाशराव सोळंके यांच्यावर केलेल्या कथित वादग्रस्त वक्तव्याचे तीव्र पडसाद रविवारी गेवराई शहरात उमटले. संतप्त झालेल्या मराठा आणि ओबीसी समाजातील युवकांनी प्रा.हाके यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला आधी दंडुकाने मारहाण केली. पुतळा पायाखाली तुडवून जाळला. या घटनेमुळे शहरातील राजकीय वातावरण तापले होते.

◆ पान १ वरून पुढे...

तसेच आमदार समर्थकांनी हाके यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले होते. दरम्यान सोमवारी लक्ष्मण हाके यांनी विजयसिंह पंडित यांच्या कार्यकर्त्यांना आव्हान देत ज्या ठिकाणी माझा पुतळा जाळला. त्याच ठिकाणी दुग्धाभिषेक करून चहा पिणार असल्याचे चॅलेंज दिले होते. यावरून शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन्ही गटातील समर्थकांची मोठी गर्दी झाली होती. लक्ष्मण हाके या ठिकाणी येताच विजयसिंह पंडित यांच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या ताफ्यावर दगडफेक करून, चप्पल फेकल्या. दरम्यान परिस्थिती नियंत्रणाच्या बाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांनी कार्यकर्त्यांवर लाठीचार्ज केला. तसेच गेवराई पोलिसांच्या लक्ष्मण हाके यांच्या गाडीला घेराव घालत शहराबाहेर काढले, यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. गेवराई शहरात तणावपूर्ण शांतता आहे. पोलीसांनी प्रकरण व्यवस्थित हाताळल्याने तणाव आटोक्यात आला आहे.

## माजलगाव मध्ये....

संकल्पाची घोषणा केली. जनतेच्या सेवेसाठी एमआयएमचा निर्धार इम्तियाज जलील यांनी सभेला संबोधित करताना सांगितले की, एआयएमआयएमचा मुख्य हेतू हा सर्वसामान्य जनतेची सेवा करणे आणि त्यांच्यातूनच सक्षम नेतृत्व निवडणे आहे. आम्ही येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ताकदीने उतरून भ्रष्ट व्यवस्थेला आव्हान देऊ. त्यांनी उपस्थित जनसमुदायाला मतदानाच्या माध्यमातून पक्षाला आशीर्वाद देण्याचे आवाहन केले, जेणेकरून सामाजिक न्याय आणि समतेची लढाई अधिक बळकट होईल. मुस्लिम समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध सडेतोड भाष्य जलील यांनी मुस्लिम समाजावर होत असलेल्या अन्यायावर भाष्य करताना, जातीवादी शक्तींमुळे निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी नुकत्याच घडलेल्या सुलेमान पठाण यांच्या दुर्दैवी हत्येचा उल्लेख करत, या प्रकरणातील आरोपींवर तातडीने कारवाई न झाल्यास कठोर पावले उचलण्याचा इशारा दिला.सुलेमान पठाण यांच्या सामूहिक हत्याकांडातील आरोपींना त्वरित अटक न झाल्यास, मुस्लिम समाज आणि एमआयएम एकजुटीने मुंबईच्या दिशेने शांततापूर्ण मोर्चा काढेल, असे त्यांनी ठणकावून सांगितले. जातीयवादी राजकारणाला आव्हान जलील यांनी भाजपसारख्या जातीवादी पक्षांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी मुस्लिम समाजाने एकजुटीने लढण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले. महाराष्ट्रात गाय आणि गोरक्षणाच्या नावाखाली मुस्लिम समाजाच्या अस्मितेला धोका पोहोचवला जात आहे. संग्राम जगताप यांच्यासारखे नेते मुस्लिमविरोधी वक्तव्ये करतात, पण गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून याकडे दुर्लक्ष केले जाते, अशी टीका त्यांनी केली. त्यांनी पुढे सांगितले की, राज्यातील सत्ताधारी पक्ष सामाजिक तेढ वाढवण्याचे काम करत असून, याला आळा घालण्यासाठी आपली एकजूट हेच सर्वात मोठे हत्यार आहे. सामाजिक

◆ पान १ वरून पुढे...

एकतेसाठी पुढाकार इम्तियाज जलील यांनी केवळ मुस्लिम समाजालाच नव्हे, तर सर्व समाजघटकांना एकत्र येण्याचे आवाहन केले. जातीयवादी शक्तींना केवळ एकजुटीच्या माध्यमातूनच पराभूत करता येईल. आम्ही सर्वांना सोबत घेऊन महाराष्ट्रात सामाजिक एकता आणि प्रगतीसाठी काम करू, असे त्यांनी जाहीर केले. येणाऱ्या निवडणुकीत पक्ष नियोजनबद्ध रणनीती अवलंबणार असून, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधी निवडण्यासाठी प्रयत्नशील राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. जनतेचा विश्वास जिंकण्याचे आश्वासन आम्ही जनतेच्या सेवेत कधीही कमी पडणार नाही, असे आश्वासन देत जलील यांनी उपस्थितांना पक्षाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले. तुमच्या मतदानाच्या रूपाने आम्हाला आशीर्वाद द्या, आम्ही महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने प्रगतीपथावर नेऊ, असे ते म्हणाले. माजलगाव येथील या सभेला कार्यकर्त्यांसह स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती, आणि जलील यांच्या भाषणाने उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण झाला. नव्या राजकीय लढाईची तयारी एआयएमआयएमच्या या सभेने महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या लढाईची नांदी झाली आहे. सामाजिक एकतेसाठी आणि जातीवादी शक्तींविरुद्धच्या या लढ्याला माजलगावातील जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वाखाली पक्ष येणाऱ्या काळात अधिक आक्रमक आणि नियोजनबद्ध पावले उचलणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## तलवाड्यात मनोरंजनार्थ....

प्रयत्नरत दिसुन येत असल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. जिल्हा पोलीस आधिक्षकांच्या पोलीस प्रशासनातील हाप्तेखाऊवृती गावातील व्यासनधिंतेला खत पाणी घालत आसल्याचा सुर महिला वर्गातुन ऐकावयास मिळत असुन या व्यासनधिंतेमुळे घरा घरात कलह निर्माण होऊन अर्थिक चणचणी भासु लागल्याने महिला वर्गाच्या शापला पोलीस प्रशासन नक्किच कारणीभूत ठरणार आसल्याचे महिला वर्गातुन बोलल्या जात आहे.

## २९ ऑगस्ट ...

संवाद साधताना केले आहे. बीड तालुक्यातील पाटोदा (बे) येथे श्रीक्षेत्र नारायण गडांचे महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शना खाली चौदाव्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता नारायण गडाचे नूतन उत्तराधिकारी हभप संभाजी महाराज यांच्या कीर्तनाने झाली. पंडित तुपे व त्यांचे सहकारी अमोल माने,अविनाश बडगे, बाबू माने, चंद्रसेन माने, भरत माने, दादा गोंदवले, गोविंदा गोंदवले, अशोक तुपे, यांच्यासह समस्त गावकरी मंडळींनी खंड हरिनाम सप्ताहाचे यशस्वी नियोजन केले. सांगता समारोप प्रसंगी परिसरातील भावी फक्त बहुसंख्येने सहभागी झाले होते.

## लोकांची सेवा...

◆ पान १ वरून पुढे...

ईश्वर सोनवणे, राहुल सरवदे यांची प्रमुख उपस्थिती होती. या संकल्प मेळाव्याला उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधताना पप्पू कागदे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आणि जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या निवडणुकीच्या माध्यमातून उपेक्षित आणि सामान्यांच्या कामासाठी अहोरात्र मदतीसाठी रस्त्यावर असलेल्या कार्यकर्त्यांना संधी मिळावी. तसेच निळ्या झेंड्याच्या माध्यमातून सेवा करण्याची अशा कार्यकर्त्यांना समाजाने संधी देण्याचे आवाहन करीत अप्रत्यक्षरित्या त्यांनी दीपक कांबळे यांच्या जिल्हा परिषदेच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब करून एक अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे. तसेच पुढे बोलताना कागदे यांनी रिपाइं चळवळीच्या मध्यातून आणि रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील ५ हजार एकर जमीन ही भूमिहीन अतिक्रमण धारकांना मिळवून दिली असून ३ हजार भूमिहीनांना त्याच्या सात बारा मिळवून देण्याचे काम केले आहे. तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी कार्यकर्ते काम करीत असतात. रामदास आठवले यांनी राज्याचे समाज कल्याण मंत्री असताना त्यांनी मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा प्रश्न सोडविला. त्यासाठी त्यांनी त्यांचे मंत्रीपद देखील डावावर लावले. त्यामुळे तत्कालीन सरकारला विद्यापीठाचे नामांतर करण्याचा निर्णय घ्यावा लागला. रिपाइंच्या माध्यमातून दलीत, शोषित, पीडित समाजाला न्याय देण्याचे काम कार्यकर्ते निस्वार्थीपणे काम करीत असल्याचा उल्लेख केला. यावेळी संकल्प मेळाव्याच्या संयोजक दीपक कांबळे यांनी प्रस्ताविक करताना सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार समाजाभिमुख करण्यासाठी आणि सामाजिक चळवळ गतिमान करण्यासाठी रामदास आठवले आणि पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली काम करीत आहोत. उपेक्षित आणि बहुजन समाजाला न्याय मिळून देण्यासाठी काम करीत असल्याचा देखील त्यांनी उल्लेख केला. तसेच गायरान जमिनी, स्मशानभूमी, घरकुल आणि विविध सरकारी योजना यात कुणाची अडवणूक होत असेल तर त्यासाठी आम्ही अहोरात्र संघर्ष करून समाजाला न्याय मिळवून देण्याचे काम कार्यकर्त्याच्या माध्यमातून करीत असल्याचा उल्लेख त्यांनी केला. संकल्प मेळावा यशस्वी करण्यासाठी गौतम बचुटे, दिलीप बनसोडे, ईश्वर सोनवणे, विकास मस्के, रमेश निशिगंध, गौतम बचुटे, निलेश ढोबळे, राजेश सोनवणे, सुरज काळे, बाळासाहेब ओव्हाळ, प्रशांत हजारे, अनिता वाघमारे, सुरेखा गायकवाड, सरस्वती शिनगारे, विकास आरकडे, भारत गायकवाड, मिलिंद भालेराव, कैलास जावळे, हरीश गायकवाड, दादाराव धेंडे, अंबादास तुपारे, रुपचंद ढालमारे, इब्राहिम इनामदार, शेख मौला, जयपाल रोकडे, प्रदिप शिनगारे, नितीन घोडके, हरेंद्र धीरे, डॉ.चत्रभुज हिरवे, मसु बचुटे, विनोद गायकवाड, रवींद्र तुपारे, संभाजी हजारे, विनोद शिंदे, रोहित बचुटे, राहुल बचुटे, आदींनी केले आहे. कार्यक्रमाचे संचलन दिलीप बनसोडे यांनी तर आभार गौतम बचुटे यांनी व्यक्त केले.

◆ पान ४ वरून पुढे...

## हवामान बदल...

नरेंद्र जोशी यांनी कांदा लागवडीबाबत माहीती देताना जुन्या वाणाच्या वापराऐवजी नवीन वाण लागवड व बिजोत्पादनाबाबत मार्गदर्शन केले. नवीन संशोधित वाण लागवड तंत्रज्ञान व साठवणुकीतील बदलावर त्यांनी प्रकाश टाकला. कांदा लागवडीची पंचसुत्री शेतकऱ्यांना दिली. कार्यक्रमात 'शेतकरी यशोगाथा' पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. तसेच शेतकरी प्रणोम शिंदे व सतीश पठाडे यांनी मनोगत व्यक्त केले. केंद्राने केलेल्या कामामुळे २२ ते ३०%. उत्पादन वाढुन खर्च कमी झाल्याचे त्यांनी सांगितले. उद्धाटनपर मार्गदर्शनात आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, विद्यापीठांनी नवीन तंत्रज्ञान विकसित करून शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचविण्यासाठी काम केले पाहीजे. पशुधनातील दुग्धोत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरली पाहीजे तसेच पर्यावरणीय असंतुलन, हवामान बदलाकडे लक्ष दिले पाहिजे. नामशेष होणारी पिके, मिलेट लागवड वाढवली पाहीजेत. हवामानाचा अचुक अंदाज घेवुन तंत्रज्ञानात बदल करून उत्पादन वाढ केली पाहीजे. पिक विमा योजनेसाठी उंबरठा उत्पन्न गृहित धरणार आहेत त्यामुळे नुकसान होताच अर्ज करावेत. कांद्याची साठवण क्षमता वाढवावी म्हणजे दर बदल झाला तरी नुकसान होणार नाही. केंद्राने तयार केलेल्या मिलेट किटचेही त्यांनी कौतुक केले. तसेच विषमुक्त अन्न निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत. असे नमुद करुन कृषी विज्ञान केंद्राने केलेल्या कामाचे कौतुक केले. सागर पठाडे यांनी कांदा चाळीचे प्रस्ताव देण्याबाबत सुचित केले. गोरख तरटे यांनी सेंद्रिय शेती पद्धतीबाबत शेतकऱ्यांशी चर्चा केली. डॉ. प्रदीप सांगळे यांनी कीड–रोग व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांशी चर्चा केली. आभार प्रमोद रेणापुरकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास पंचक्रोशीतील ३०० पेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाची यशस्वीतेसाठी विविध शेतकरी गट, शेतकरी सतीश पठाडे, प्रणोम शिंदे, गळगटे, भाऊ धोंडे व इतरांनी परिश्रम घेतले.

## खा.बजरंग सोनवणेंच्या...

जिल्ह्यातील ७३ गावातील १८ हजार २२३ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येते. डावा कालवा ९० कि.मी. अंतराचा आहे. त्यातून १०,५५९ हेक्टर शेती तर, उजवा कालवा ७८ कि.मी.चा असून त्याअंतर्गत ७६६५ हेक्टर शेती सिंचनाखाली येते. खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामासाठी सरासरी १८५ दलघमी पाण्याचा वापर होते. याशिवाय केज व कळंब तालुक्यातील २७ गावातील शेतकऱ्यांना मांजरा धरणाच्या बॅकवॉटर पाण्याचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष लाभ होतो. तसेच धरणातील पाण्यावर बिगर सिंचन योजना सुध्दा २१ आहेत तर पिण्याच्या पाणी योजना १६ कार्यरत आहेत. नागरिकांना पिण्यासाठी सरासरी ६१.९३ दलघमी एवढे पाणी आरक्षित ठेवण्यात येते. पाण्याच्या सिंचनाच्या व औद्योगिक दृष्ट्या मांजरा धरण अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मागील काही दिवसांपुर्वी धरण पुर्णपणे भरले होते. यानंतर सहा दरवाजे उघडून पाणी सोडण्यात आले होते. आता चार दरवाजे बंद करण्यात आले असून दोन दरवाज्यातून ४९.४८ क्यूसेक्सने मांजरा नदी पात्र पाण्याचा विसर्ग सुरू आहे. मांजरा धरणामुळे केज तालुक्यातील मोठ्या प्रमाणात हरीतक्रांती झालेली असून आज खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते जलपुजन होत आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## अन्यायकारक अधिभार...

८५४ इतकी होत आहे. त्यामध्ये निव्वळ उर्जा शुल्क अंदाजे रुपये ४०० असून उर्वरित रक्कम विविध अधिभार व स्थिर शुल्काच्या स्वरूपात आकारली जाते. उर्जा शुल्क, वहन शुल्क, प्रसारण शुल्क, व्हिलींग शुल्क, इंधन समायोजन अधिभार, स्थिर शुल्क तसेच विविध कर व अधिभार यांच्या आकारणीमुळे सामान्य ग्राहकांवर अतिरिक्त भार येत आहे. औद्योगिक व व्यापारी ग्राहकांवर लावावयाचे अधिभार प्रत्यक्षात घरगुती ग्राहकांवर लादले जात आहे. विशेषत्वाने निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे की, स्मार्ट मीटर बसविण्याची योजना प्रत्यक्षात खाजगी कंपनीच्या फायद्यासाठी राबविण्यात आलेली असून, त्यातून सामान्य नागरिकांना बिल वाढणे, चुकीचे रीडिंग, आणि ग्राहक सेवेत होणाऱ्या त्रुटी यामुळे अनेक अडी अडचणींचा सामना करावा लागत आहे. या संदर्भातील तक्रारींची दखल घेतली जावी व तातडीने स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक असल्याचे निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले. ग्राहकांच्या हितरक्षणाकरिता शासनाने तातडीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे : १. घरगुती ग्राहकांच्या वीज देयकातील सर्व अधिभारांचे पारदर्शक व तपशीलवार स्पष्टीकरण सार्वजनिक करावे. २. शंभर युनिटपर्यंत वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठी अधिभार व स्थिर शुल्कावर मर्यादा घालून संरक्षित दर लागू करावेत. ३. स्मार्ट मीटर संदर्भातील सर्व तक्रारींची स्वतंत्र चौकशी करून ग्राहकांना योग्य पर्याय उपलब्ध करून द्यावेत. ४. औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांचे अधिभार घरगुती ग्राहकांवर टाकले जाणार नाहीत, याबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत. ५. विलंबाने देयक भरल्यास घरगुती ग्राहकांचे विद्युत कनेक्शन तात्काळ तोडण्याऐवजी किमान पंधरा दिवसांची मुदत द्यावी. ६. दरवाढ निश्चित करताना विद्युत निर्मिती खर्च, इंधन खर्च व वाहतूक खर्चाचा तपशीलवार हिशेब घेऊनच निर्णय घ्यावा. ७. इंधन समायोजन अधिभार व इतर आकारणीच्या माध्यमातून जादा वसुल झाल्यास ती रक्कम पुढील देयकात कपात करून ग्राहकांना परत करावी. ८. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (चएठउ) सार्वजनिक सुनावणीमध्ये शहरी व ग्रामीण भागातील ग्राहक प्रतिनिधींना अनिवार्यपणे सामावून घेण्यात यावे. ९. कृषी ग्राहकांना अधिभारातून सवलत देऊन त्यांच्या कनेक्शन तोडण्यापूर्वी किमान तीस दिवसांची मुदत देण्यात यावी.१०. स्मार्ट मीटर भारतीय मानक ब्युरो (इखड) प्रमाणित असल्याची खात्री करून, चुकीच्या देयकाबाबत ग्राहकांना तातडीने भरपाई मिळण्याची तरतूद करावी.

## सर्वोत्तम गावरस्करांनी...

किस्से सांगून श्रोत्यांना खळखळून हसवले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रदीप दुबे तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख ,ज्येष्ठ पत्रकार अशोकराव देशमुख उपस्थित होते. यावेळी पुढे बोलतांना पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने म्हणाले की बीडच्या सर्व पत्रकारांनी मिळून बीडची रेल्वे आणण्यासाठी प्रयत्न केले होते. रेल्वे लवकरात लवकर यावी अशी सदिच्छा आहे. याबरोबरच बीडची जी प्रतिमा मलिन झाली आहे ती सुधारण्यासाठी बीडच्या सर्व पत्रकारांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत. पूर्ववत व्हायला वेळ लागेल. मात्र ते पत्रकारच करू शकतात असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. पद्मश्री डॉ. तात्यासाहेब

◆ पान ४ वरून पुढे...

लहाने आणि संपादक सर्वोत्तम गावस्कर हे एकेकाळचे रूममेट होते. त्यांना कधी वाटले नव्हते की सर्वोत्तम गावस्कर संपादक होतील मात्र ते यशस्वी झाले याचा आनंद आहे. आणि मित्र म्हणून या कार्यक्रमाला येणे मला क्रम प्राप्त होते असे यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम. देशमुख म्हणाले की पत्रकारिता करत असताना माझा सर्वात जास्त पत्रकारांशी जवळचा संबंध आला संभाजीनगरला असतांना. आम्ही सर्वांनी सोबत पत्रकारिता केली त्यामुळे कनिष्ठ संबंध निर्माण झाले. पत्रकारिता मध्ये नागोजीराव दुधगावकर पुरस्कार द्यायला सर्वोत्तम गावस्करांना उशीर झाला ही गोष्ट खरी आहे. मात्र त्यांच्या कर्तृत्वामुळेच हा पुरस्कार मिळालेला आहे. त्यांच्या आगामी काळात अनेक पुरस्कार मिळोत अशी सदिच्छा व्यक्त केली. यावेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रदीप दुबे यांनी त्यांच्या कॉलेज जीवनातील अनेक किस्से सांगितले .सर्वोत्तम गावस्कर यांच्या सत्काराची माहिती मिळाल्यानंतर मी स्वतःहून आलो कारण दीर्घ काळ आम्ही सोबत होतो आणि आमची मैत्री आजही घट्ट आहे. त्यामुळे मला येणे भाग पडले. यावेळी दुबे यांनी बीडची पत्रकारिता सकारात्मक आहेच जिल्ह्याची मलिन झालेली प्रतिमा सुधारण्यासाठी आता पत्रकारिताच जिल्ह्याची प्रतिमा सुधारू शकते असे यावेळी प्रदीप दुबे यांनी सांगितले .

## बाबुजी आव्हाड...

रुग्णालय पाथर्डी) हे उपस्थित होते. यावेळी अँड .सुरेशराव अव्हाड यांनी रक्तदान केल्यामुळे एखाद्या व्यक्तीचे प्राण वाचविले जाते. त्यामुळे प्रत्येक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांने रक्तदान करावे असे आवाहन केले. या रक्तदान शिबिरामध्ये एकूण २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिराचे आयोजन डॉ.अरुण राख, प्रा.आनंद घोंगडे, डॉ वैशाली आहेर, कॅप्टन डॉ. अजयकुमार पालवे, प्रा. ब्रह्मानंद दराडे, डॉ.अभिमन्यू ढोरमारे, डॉ.अशोक डोळस जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर रक्त संकलन केंद्राचे मा.संपत आंधळे, गोकुळ गर्जे, डॉ.दीपक पवार, रवी भोईटे, संदीप कांबळे इत्यादींनी शिबिर यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

## नवगण राजुरी...

आहे. बुधवार दि. २७ रोजी श्री गणेशास गंगेच्या कावडीने जलाभिषेक घालण्यात येईल. रात्री ११ ते १२ या वेळेत आरती, उपासना व गणेश जन्माचे भजन होईल. सोमवार दि.०१ सप्टेंबर रोजी महाद्वारचा अनादिकाला होईल नंतर श्रीच्या पालखीची भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या सप्ताहाची सांगता मंगळवार दि.०२/०९/ २०२५रोजी सकाळी १०ते १२ या वेळेत श्रीक्षेत्र संस्थान नारायण गडाचे मठाधिपती ह. भ. प. प्रेममूर्ती महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याचे कीर्तनाने होणार असून त्यानंतर महाप्रसाद होईल. तरी भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंगलमूर्ती देवस्थानचे अध्यक्ष रवींद्र क्षीरसागर व समस्त ग्रामस्थ मंडळ नवगण राजुरी यांनी केले आहे.

## स्थानिक आपत्तीचा...

भरपाईची मागणी पीक विम्यातून होणारच नाही. त्यामुळे सरकारने

◆ पान ४ वरून पुढे...

संकटाच्या काळात नियमित हक्काची मदत २५ टक्के अग्रिम देण्यासाठी पुर्वीप्रमाणेच ट्रेगर सुरू करावेत या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२५ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत लक्ष्यवेधी शिमगा आंदोलनकरण्यात आले. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात शेख युनुस,बाळासाहेब मोरे, रामनाथ खोड, रामनाथ खोड,किष्किंधा पांचाळ, पांचाळ,शिवशर्मा शेलार,शेख मुबीन, सय्यद इरार, सरफराज आदी सहभागी होते. गेल्या आठवड्यात अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यात पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अहवालानुसार सुमारे २,७४५ हेक्टर पिकांचे नुकसान झालेले आहे. जिल्ह्यात यंदा ११ लाख ७६ हजार ७५२ शेतकऱ्यांनी पिक विमा भरला आहे. यंदा ५ लाख १० हजार २०४ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित करण्यात आले आहे. तरी यंदा पिक विम्याच्या नियमावलीत बदल झाल्याने आता शेतकऱ्यांना नुकसान होऊनही भरपाईसाठीचा २५ टक्के अग्रीम मिळणार नाही. किंवा नुकसानीनंतर तक्रारी करता येणार नाही. पीक कापणी प्रयोगावर आधारित उंबरठा उत्पन्न ग्राह्य धरून विमा दिला जाणार आहे. त्यामुळे नुकसान होऊनही व विमा भरूनही शेतकऱ्यांना पिक विमा मिळेल की नाही याबाबत चिंता आहे.

## श्री मंगलनाथ मल्टीस्टेटची...

अनेक संस्था तरलतेअभावी कार्य करू शकल्या नाही त्यामध्ये श्री मंगलनाथ मल्टीस्टेट संस्था अश्या परस्थितीत भक्कम पने उभे राहून सभासदांना अविरत सेवा देण्याचे कार्य करत आहे याचे कारण म्हणजे संस्थेच्या सभासदांच्या ठेवीन देण्यात येणारी सुरक्षितता व जलद सेवा यांच्या सूत्रांवर आधारित निर्माणकेलेल्या सभासदांच्या विश्वासाच्या बळावर संस्था अविरत कार्य करत आहे. असे सांगितले यापुढे देखील रोप्यमहोतस्वी वर्षानिमित्त विविध योजना सभासदांकरिता आखून सुरक्षित कर्ज वाटप करून ठेवीन अधिकाधिक सुरक्षितता प्रधान करण्याचे कार्य संस्था सातत्याने करणार आहे असे सांगितले व मागील काळात सहकार्य करणाऱ्या सभासदांचे आभार व्यक्ते केले. या सभेसाठी संस्थेचे उपाध्यक्ष श्री जाधव नारायण सर,सर्व सन्माननीय संचालक मंडळ व सभासद वर्ग शेकडोच्या संख्येने उपस्थतीत होते..

## हजरत शहेनशाह...

होणार आहे यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन इनसानियत फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सोहिल शेख उपाध्यक्ष रिजवान चाऊस ,उपाध्यक्ष अकबर शेख, सचिव आवेझ शेख ,जिल्हा संपर्क अध्यक्ष अफरोज खान ,तालुका अध्यक्ष हमीद शेख ,तालुका युवक अध्यक्ष मोसिन शेख ,शहराध्यक्ष आवेज मणियार , सर्व समाजसेवक हमीद पाले खान ,अखील अण्णा नसीर खान ,अरफात खान शाहेद मेंबर, नदीम पटेल नईम लाला, जिशान लाला नवीद खान (बाबा) सलमान अली यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# ‘व्हिजन डॉक्युमेंट’मध्ये जनसामान्यांच्या संकल्पनांचे प्रतिबिंब असावे: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन डॉक्युमेंट प्रारूप मसुदा सादरीकरण बैठक



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याला २०४७ पर्यंत ‘विकसित महाराष्ट्र’ करण्यासाठी अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन उद्दिष्टांचा समावेश असलेले व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यात येत आहे. यासाठी जनतेच्या संकल्पना जाणून घेण्यात आल्या असून यामध्ये चार लाखापेक्षा जास्त नागरिकांनी आपला सहभाग नोंदविला आहे. हे व्हिजन डॉक्युमेंट जनसामान्यांच्या संकल्पनांचे प्रतिबिंब असावे. भविष्यामध्ये कुठलीही योजना, उपक्रम किंवा निर्णय घेताना व्हिजन डॉक्युमेंट समोर ठेवून घेता आले पाहिजे, असे व्हिजन डॉक्युमेंट पथदर्शी ठरावे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

सह्याद्री अतिथिगृह येथे विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन डॉक्युमेंट प्रारूप मसुदा सादरीकरण बैठकीचे आयोजन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वित्त व नियोजन राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ध्येय निश्चित असल्यानंतर ध्येयप्राप्ती करण्याचा मार्गही प्रशस्त होतो. त्या दृष्टिकोनातून विकसित महाराष्ट्र ध्येयपूर्तीसाठी या ‘व्हिजन डॉक्युमेंट’च्या माध्यमातून हा मार्ग तयार होत आहे. राज्याला केवळ देशातच नाही, तर जागतिक पातळीवर सर्वोत्कृष्ट करण्यासाठी या ‘व्हिजन डॉक्युमेंट’ मधील उपाययोजनांची अंमलबजावणी व्हावी. प्रत्येक विभागाने ठेवलेली ध्येय निश्चिती प्राप्त होण्यासारखी आहे. यासाठी यंत्रणांनी आधुनिक तंत्रज्ञान, नवनवीन संकल्पना आणि या क्षेत्रातील जगातील सद्यस्थिती लक्षात घेऊन कार्यवाही करावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

सर्वसामान्य जनतेने या डॉक्युमेंटच्या निर्मितीसाठी घेतलेला सक्रिय सहभाग त्यांची राज्याच्या विकासाप्रती असलेली भावना अधोरेखित करीत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस यांनी सहभाग घेतलेल्या जनतेचे आभार मानले. एका सखोल विचार प्रक्रियेतून हे व्हिजन डॉक्युमेंट तयार होत असल्याबद्दल समाधान व्यक्त करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्य संपूर्ण विकसित होण्यासाठी राज्यासमोर असलेली आव्हाने व्हिजन डॉक्युमेंट निर्मितीच्या अनुषंगाने समोर आली आहेत. हा मार्ग खडतर जरी असला, तरी अशक्यप्राय नाही, हे सुध्दा यातून स्पष्ट झाले आहे. विकसित महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी हा अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज म्हणून समोर येणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# श्री नारायण विद्यालयात सौ. सीमाताई ओस्तवाल यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण मा. व उच्च मा. विद्यालयात गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड आयोजित व प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री रमेशजी पोकळे साहेब ( मा. चेअरमन स्थायी समिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजी नगर ) प्रमुख पाहुणे म्हणून सौ. सीमा मनोज ओस्तवाल (अध्यक्ष गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड ), मा. सौ. रूपाली देशपांडे ( सामाजिक कार्यकर्त्या) संस्थेचे अध्यक्ष मा.श्री महादेवराव काळे अण्णा, संस्थेचे सचिव तथा प्राचार्य श्री अमोल काळे सर, सौ. राजश्री काळे/ पिंगळे मॅडम, मा.श्री देशपांडे साहेब, सौ. सुजाता सावंत मॅडम, श्री बप्पासाहेब हावळे इत्यादी होते.

सौ. सीमा ओस्तवाल यांच्या बाबतची माहिती सांगून विद्यार्थी इतर समाज यांच्या विकासासाठी मदत करणे कौतुकास्पद आहे असे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री रमेशजी पोकळे साहेब यांनी गुरु आनंद महिला प्रतिष्ठान शिक्षण क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शालेय शैक्षणिक साहित्य देत आहात हे कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

शाळेमध्ये पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वह्या,पेन्सिल,पेन वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री करपे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन शेख सर यांनी मानले.

# मराठवाड्याचा मान उंचावला - डॉ. अनिकेत कुलकर्णी यांची सीएसइपीआय राष्ट्रीय कार्यकारिणीत निवड

**बीड । प्रतिनिधी**

हैदराबाद येथे पार पडलेल्या सीएसइपीआय (सेक्सॉलॉजीस्ट डॉक्टरांची राष्ट्रीय परिषद) च्या वार्षिक सभेमध्ये बीडचे सुपुत्र डॉ. अनिकेत अनिलराव कुलकर्णी यांची राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड झाली आहे. हा मान मिळवणारे ते मराठवाड्यातील पहिलेच डॉक्टर ठरले असून, त्यांच्या या उल्लेखनीय निवडीमुळे संपूर्ण प्रदेशाचा अभिमान वाढला आहे. समाजात लैंगिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, संशोधनाला चालना देणे आणि नवीन उपचारपद्धतींविषयी मार्गदर्शन करणे या उद्देशाने सीएसइपीआय कार्यरत आहे. डॉ. अनिकेत कुलकर्णी यांच्या कार्याची दखल घेऊन मिळालेल्या या मानामुळे बीडसह संपूर्ण मराठवाडा गौरवान्वित झाला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून हार्दिक अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान दारु विक्री बंद, जिल्हाधिकाऱ्यांचा मोठा निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाला २ दिवस शिल्लक आहेत. संपूर्ण राज्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाईल. या दरम्यान कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणादेखील सज्ज आहे. दरम्यान गणेशोत्सव काळासाठी पुण्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी अत्यंत महत्वाचा निर्णय घेतलाय.

२७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर तारखेपर्यंत खडक, विश्रामबाग फारसखाना या पोलीस स्टेशन हद्दीतील सगळी दारू विक्र राहणार बंद राहणार आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतलाय. तर गणपती आगमन आणि विसर्जन दिवशी पुणे जिल्ह्यात पूर्ण दारू बंदी असणार आहे. ५ व्या आणि ७ व्या दिवसाच्या गणपती विसर्जन मिरवणूक मार्गावरदेखील दुकान बंद राहणार आहेत.




पुण्याचा भव्य आणि ऐतिहासिक गणेशोत्सव आता फक्त शहरापुरता मर्यादित न राहता जगभर प्रसिद्ध झालाय. हा उत्सव धार्मिक रूढी आणि सांस्कृतिक परंपरेनुसार साजरा केला पाहिजे, या उद्देशाने यावर्षी डीजे वाजवणाऱ्या गणेश मंडळांना कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत किंवा जाहिरात दिली जाणार नाही, असे 'पुनीत बालन ग्रुप'चे अध्यक्ष पुनीत बालन यांनी स्पष्ट केले आहे. 'समर्थ प्रतिष्ठान'च्या ढोल-ताशा पथकाच्या संगीतमय पूजा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी खासदार मेधा कुलकर्णी, कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

# शासन अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी; एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही – पालकमंत्री संजय राठोड

**यवतमाळ । प्रतिनिधी**

जिल्ह्यात गेल्या आठवड्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाल्याने ठिकठिकाणी मोठे नुकसान झाले. अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका उमरखेड, महागाव तालुक्याला बसला. आज पालकमंत्र्यांनी या दोनही तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. शासन अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, असे यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधतांना पालकमंत्री म्हणाले. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी पालकमंत्री श्री.राठोड यांनी प्रत्यक्ष नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन केली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार किसन वानखडे, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे, उमरखेड तहसीलदार राजु सुरडकर, महागाव तहसिलदार श्री.मस्के, पराग पिंगळे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी पाहणी दौऱ्यात सहभागी होते.

पालकमंत्र्यांनी यावेळी महागाव तालुक्यातील फुलसावंगी, उमरखेड तालुक्यातील नारळी, कुरली, चिखली, कोरटा, दराटी या गावाला भेट देऊन तेथील नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला, त्यांच्या समस्या, व्यथा जाणून घेतल्या. या गावांमधील शाळा, आरोग्य केंद्रांना भेट देऊन तेथे झालेल्या नुकसानीची माहिती त्यांनी घेतली.

# सामान्य विद्यार्थ्यालाही सैनिकी शाळांमध्ये शिक्षणासाठी सकारात्मक निर्णय घेणार : शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील सामान्य विद्यार्थ्यालाही सैनिकी शाळांमध्ये तसेच राष्ट्रीय इंडियन मिलिट्री कॉलेजसारख्या संस्थांमध्ये शिकता यावे यासाठी सकारात्मक निर्णय घेण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. यासाठी सैनिकी शाळांना केंद्र व राज्य शासनामार्फत देण्यात येणारा निधी, विद्यार्थी संख्या आणि शुल्क यासंदर्भात अभ्यासपूर्ण अहवाल सादर करण्याचे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले. शालेय शिक्षण विभागाच्या विविध योजना व उपक्रमांसंदर्भात मंत्रालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. बैठकीस शालेय शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह,



‘एससीआरटीई’चे संचालक राहूल रेखावार हे दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. सहसचिव सर्वश्री ताशिलदार, समीर सावंत, उपसचिव तुषार महाजन यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

शालेय शिक्षण मंत्री श्री.भुसे म्हणाले की, सैनिकी शाळांमध्ये राज्यातील सामान्य विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी, त्यांच्या शैक्षणिक शुल्काचा भार स्वीकारण्यासंदर्भात सकारात्मक अहवालाअंती निर्णय घेण्यात येईल. या निर्णयामुळे राज्यातील सामान्य विद्यार्थ्यांना दिलासा मिळू शकेल. पुण्यातील मौजे भांबुर्डा, शिवाजीनगर येथे शिक्षण आयुक्तालयाच्या बांधकामासंदर्भातही यावेळी आढावा घेण्यात आला. डिसेंबरपर्यंत या इमारतीचे बांधकाम पर्यावरणपूरक, ऊर्जा बचत करणारे, शाश्वत विकासाला हातभार लावणारे, प्रदूषण कमी करणारे, अशा प्रकारे पूर्ण करावे. सेंटर ऑफ एक्सलन्स संदर्भात सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा, चर्नी रोड येथील बालभवनचे बांधकाम त्याचे ऐतिहासिक महत्त्व राखून सप्टेंबरपर्यंत पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

# बळजबरीने प्रेमसंबंध ठेवण्यास प्रवृत्त केलं, इन्स्टाग्रामवर मुलासोबत गळ्यात हात टाकलेला फोटो शेअर केला, बदनामी झाल्यानं नाशिकमधील अल्पवयीन मुलीनं गळ्याला लावला दोर

**नाशिक । प्रतिनिधी**

महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थिनीला जबरदस्तीने प्रेमसंबंध ठेवण्यास सांगून सातत्याने होणाऱ्या त्रासाला कंटाळून तसेच इन्स्टाग्रामवर फोटो ठेवून बदनामी झाल्यामुळे विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नाशिकमध्ये घडली आहे.

याबाबत फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, त्यांची मुलगी कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना कॉलेजमध्ये शिकणारा गणेश भांगरे (२० रा. रामटेकडी झोपडपट्टी तपोवन) अक्षय मदन वरठे (२१ रामटेकडी झोपडपट्टी तपोवन) अतिष राजकुमार वैद्य (पूर्ण पत्ता माहित नाही) यांनी मयत मुलीच्या गळ्यात हात घालून काढलेला फोटो इंस्टावर ठेवल्याने समाजामध्ये बदनामी झाली. ही बदनामी सहन न झाल्याने तिने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. दोघे संशयित कॉलेजमध्ये वेळोवेळी येऊन तिला आरोपी सोबत जबरदस्तीने प्रेमसंबंध ठेवण्यास भाग पाडत होते. या प्रकारामुळे मुलीवर मानसिक ताण निर्माण झाला होता. आरोपींनी फिर्यादीच्या मुलीचे इन्स्टाग्राम युजर आयडी व पासवर्ड वापरून तिचे सोशल मीडिया खाते उघडले. त्यानंतर, तिचा व आरोपी अक्षय वरठे याचा गळ्यात हात घालून काढलेला फोटो त्या इन्स्टाग्राम खात्यातून अक्षय वरठे याच्या इन्स्टाग्रामवर पाठवून तो तिचा बॉयफ्रेंड आहे, असा मजकूरसुद्धा लिहून फोटो पोस्ट केला. त्यामुळे मुलीची समाजात आणि कॉलेजमध्ये बदनामी झाली. त्यानंतर गणेश भांगरे नामक व्यक्तीने मुलीला फोन करून अश्लील आणि अपमानास्पद भाषेत शिवीगाळ केली. त्याचप्रमाणे, तिच्याविरोधात सोशल मीडियावर बदनामीकारक मजकूर पसरवून तिचा मानसिक छळ केला. या सर्व प्रकारांच्या एकत्रित परिणामामुळे नैराश्यातून आत्महत्या केल्याचा आरोप नातेवाईकांनी आरोप केला आहे. या प्रकरणातील सर्व दोषी आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी फिर्यादीने केली आहे.

# २६ लाख अपात्र लाडक्या बहिणींची जिल्हास्तरीय छाननी सुरू, आता कारवाई होणार; अदिती तटकरेंची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या २६ लाख महिला या अपात्र ठरल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या अपात्र लाभार्थ्यांची आता जिल्हास्तरीय सुक्ष्म छाननी सुरू असल्याची माहिती राज्याच्या महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी दिली. या छाननीतून अपात्र ठरलेल्या महिलांवर योग्य ती कारवाई होईल असंही त्या म्हणाल्या. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभ घेत असलेल्या लाभार्थींपैकी सुमारे २६ लक्ष लाभार्थी योजनेच्या निकषानुसार पात्र दिसून येत नसल्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाने प्राथमिक माहिती उपलब्ध करुन दिली होती. सदर सुमारे २६ लक्ष लाभार्थी राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील आहेत.




त्यानुसार महिला व बालविकास विभागाने सदर लाभार्थ्यांची प्राथमिक माहिती संबंधित जिल्हा यंत्रणेला छाननीसाठी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानुसार हे लाभार्थी योजनेच्या निकषानुसार पात्र ठरतात किंवा नाही याबाबतची सुक्ष्म छाननी क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे. छाननीअंती या लाभार्थींची पात्रता/अपात्रता स्पष्ट होणार आहे. छाननीअंती जे लाभार्थी अपात्र ठरतील त्यांच्याबाबत माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनानुसार योग्य कारवाई करण्यात येईल, तसेच पात्र ठरणाऱ्या लाभार्थ्यांचा लाभ यापुढेही पूर्ववत सुरु राहील.

# पंचनाम्यातून एकही नुकसानग्रस्त वंचित राहणार नाही याची दक्षता घ्या: पालकमंत्री जयकुमार गोरे

**सोलापूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून अतिवृष्टी व सततचा पाऊस तसेच उजनी व वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रामधील पावसामुळे धरणाच्या पाणी पातळीमध्ये सातत्याने वाढ होत होती. धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग निरा, भीमा व सीना नदीपात्रात सोडण्यात आला होता. जिल्ह्यात अतिवृष्टी व पूरपरस्थितीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा. पंचनामे करतांना एकही नुकसानग्रस्त शेतकरी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.



जिल्ह्यातील अतिवृष्टी व पूरपरस्थितीमुळे झालेल्या नुकसानीबाबतची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवन येथे घेण्यात आली. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे बोलत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, शहर पोलीस आयुक्त एम राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले प्रांत अधिकारी सदाशिव पडदुने, सुमित शिंदे, सचिन इथापे, विजया पांगारकर तंत्र अधिकारी सतीश देशमुख, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, अभियंता श्री खांडेकर तसेच सर्व तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यावेळी उपस्थित होते.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • मंगळवार, दि. २६ ऑगस्ट २०२५ • पान ४

## थोडक्यात...

### भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघटनेची आज रोजी महत्वपूर्ण बैठक

**बीड । प्रतिनिधी**

पत्रकारांच्या विविध मागण्या, अडचणी, आणि धोरणात्मक पावले उचलण्यासाठी, तसेच संघटनात्मक बांधणी आणि पत्रकारांवर होत असलेल्या अन्याय, अत्याचार व हल्ल्यांवर चर्चा करण्यासाठी बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे २६ ऑगस्ट रोजी दुपारी एक वा. महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे.भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघटना प्रदीप कुलकर्णी प्रदेश अध्यक्ष यांच्या आदेशाने या बैठकीला मार्गदर्शन करण्यासाठी भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघटना मराठवाडा विभागीय अध्यक्ष आत्मलिंग शेटे जिल्हाध्यक्ष दिगंबर सोळंके, जिल्हा सरचिटणीस बालाजी जगतकर व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ह्या बैठकीमध्ये जिल्हा कार्यकारणी विस्तार आणि विविध पदांवर नियुक्ती दिली जाणार असून, पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्या पत्रकार, युट्यूब पत्रकार, संपादक, आणि वृत्तपत्र क्षेत्राशी निगडित पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ही बैठक पत्रकारांच्या एकजुटीसाठी व त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी महत्त्वाची बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

### श्री मंगलनाथ मल्टीस्टेटची वार्षिक सभा संपन्न; सभासदांकरिता १२% लंभाश जाहीर




**माजलगाव। प्रतिनिधी**

श्री मंगलनाथ मल्टीस्टेट ची वार्षिक सभा संपन्न झाली. सदरील सभेमध्ये मागील आर्थिक वर्षातील आर्थिक पत्रके लेखापरीक्षण अहवाल, संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक ड रवींद्र कानडे यांनी सभेमध्ये मांडले व संस्थेच्या सुविधा व सुरक्षिततेवर प्रकाश टाकण्यात आला. आज संस्थेचा एकूण व्यवसाय ५२९ कोटी पेक्षा अधिक असून त्यामध्ये एकूण कर्ज वाटपाच्या ९७ % कर्ज वाटप हे सुरक्षित सोनेतारण कर्जवाटप आहे व संस्थेचा स्वनिधी २७ कोटी आहे यासर्व बाबी चे अवलोकन केले असता सभासदांचे हित जोपासून ठेवीना सुरक्षा कवच निर्माण करण्याचे काम संस्था सातत्याने करत आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री आर.जी कानडे साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, मंगलनाथ समूह गेली २५ वर्षांपासून सेवा देत आहे व स्थापनेपासून सभासदांना सातत्याने १२% लाभांश देण्यात येत आहे यावर्षी देखील परंपरागत संस्थेच्या सभासदांना १२% लंभाष देण्याचे योजिले आहे त्याच बरोबर केवळ व्यवसाय वाढ हे धोरण न ठेवता वैधानिक बाबीची पूर्तता करून संस्था स्थापने पासून लेखापरीक्षण अ वर्ग प्राप्त संस्था आहे मागील वर्ष हे सहकार क्षेत्रासाठी अतिशय आव्हानात्मक होते ▶ उर्वरित पान २ वर

### हजरत शहेनशाह वली दर्गा उरुस निमित्त भव्य रक्तदान शिबीर

**सहभागी होण्याचे इन्सानियत फाउंडेशनच्या वतीने आवाहन**



**बीड । प्रतिनिधी**

हजरत शहेनशाह वली दर्गा उरुस निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या रक्तदान शिबिरामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन इनसानियत फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख सोहिल , उपाध्यक्ष रिजवान चाऊस सचिव, शेख आवेज , यांनी केले असून दिनांक २६ ऑगस्ट मंगळवारी सकाळी १० ते दुपारी चार पर्यंत रक्तदान शिबिर होणार आहे . इनसानियत फाउंडेशनच्या वतीने हजरत शहेनशाह वली दर्गा उरुस निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरामध्ये मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी होत रक्तदान करावे, या रक्तदान शिबिराला प्रोत्साहन देण्यासाठी पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक, यांच्यासह शहरातील प्रत्येक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षकांना निमंत्रण देण्यात आले असून सर्वपक्षीय जिल्हाध्यक्ष व सर्व धर्मीय सामाजिक संघटनांचे पदाधिकारी यांनाही या भव्य रक्तदान शिबिरात सहभागी होण्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबिर हजरत शहेनशाह वली दर्गा च्या पाठीमागे ठेवण्यात आले आहे. दिनांक २६ ऑगस्ट वार मंगळवार सकाळी दहा ते दुपारी चार वाजेपर्यंत रक्तदान शिबिर ▶ उर्वरित पान २ वर




# हवामान बदल लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी तंत्रज्ञान वापरावे: आमदार सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

विद्यापीठांनी नवीन तंत्रज्ञान विकसित करून शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचविण्यासाठी काम करून पशुधनातील दुग्धोत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरली पाहीजे तसेच पर्यावरणीय असंतुलन, हवामान बदलाकडे लक्ष दिले पाहिजे. नामशेष होणारी पिके, मिलेट लागवड वाढवली हवीत.तसेच हवामानाचा अचुक अंदाज घेवुन तंत्रज्ञानात बदल करून उत्पादन वाढ केली पाहीजे असे मत आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केले . दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई यांच्या वतीने प्रक्षेत्र दिवस उडीद व रब्बी पीक व्यवस्थापन मार्गदर्शन कार्यक्रम (दि२३ रोजी)हरिनारायण आष्टा ता. आष्टी येथे घेण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जि.प. सदस्य अमरराजे निंबाळकर हे होते. प्रमुख पाहुणे गोरख तरटे तालुका कृषी अधिकारी - आष्टी, व सागर पठाडे तालुका कृषी अधिकारी - केज हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार सुरेश




धस यांनी केले. व्यासपीठावर गणेश माळवे सरपंच-आष्टा, वैभव पठाडे -उपसरपंच आष्टा तसेच कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ नरेंद्र जोशी, कृष्णा कर्डिले, प्रमोद रेणापुरकर, डॉ. प्रदीप सांगळे यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृष्णा कर्डिले,शास्त्रज्ञ (पीकविद्या) यांनी केले. कडधान्यवर्गीय पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा प्रसार- प्रचार व्हावा तसेच मृदा आरोग्य व्यवस्थापनाबरोबर शेतकरी उत्पादन व उत्पन्न वाढावे हा या कार्यक्रमाचा हेतु असल्याचे सांगुण कृषि विज्ञान केंद्राने आष्टी तालुक्यात केलेल्या कामाची माहीतीही त्यांनी दिली. उद्यानविद्या शास्त्रज्ञ ▶ उर्वरित पान २ वर

## खा.बजरंग सोनवणेंच्या हस्ते आज'मांजरा'तील जलपूजन शेतकऱ्यांची राहणार उपस्थिती, दोन दरवाज्यातून पाण्याचा विसर्ग

**केज । प्रतिनिधी**

केज, अंबाजोगाई, धारूर, लातूर, कळंब या शहरासह ६१ गावांची तहान भागवणारे व मांजरा पट्ट्यातील पाच तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आणणारे केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरण १०० टक्के भरले आहे.आज सकाळी दहा वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते धरणातील पाण्याचे जलपुजन



करण्यात येणार आहे.

**•मांजरा धरणाची संक्षिप्त माहिती**

-प्रकल्पीय क्षेत्र ४५ चौरस किमी.
-पूर्ण संचयी पाणीपातळी ६४२.३७ मीटर
-प्रकल्पीय एकूण पाणीसाठवण क्षमता २२४.०९३ दलघमी.
-मृत पाणीसाठा ४७.130 दलघमी.
-उपयुक्त (जिवंत) पाणीसाठा क्षमता 1७६.९६3 दलघमी.

लातूर शहर, लातूर औद्योगिक वसाहत, केज, अंबाजोगाई, धारूर, कळंब या शहरासह ६१ गावे मांजरा धरणातील पाणी पुरवठ्यावर निर्भर असतात. मांजरा धरण पिण्याचे पाण्याबरोबर शेती पिकांना लागणाऱ्या पाण्यासाठी देखील महत्त्वपूर्ण आहे. धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्या अंतर्गत बीड, धाराशिव आणि लातूर ▶ उर्वरित पान २ वर

## संस्कारमध्ये कै. चक्रधर दंडे यांना विनम्र अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**



येथील संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली/दुसरी विभागामध्ये कै. चक्रधर दंडे यांच्या पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी संस्कार विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती शोभाताई कुलकर्णी उपस्थित होत्या. माननीय विभाग प्रमुख श्रीमती विद्याताई पारगावकर यांनी संस्कार विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष श्री चक्रधर दंडे यांच्या जीवन कार्याचा तसेच संस्कार विद्यालयाचा हा वटवृक्ष उभा करताना कै. चक्रधर दंडे यांनी कसे कार्य केले हे स्पष्ट केले. यावेळी इयत्ता पहिली /दुसरी विभागातील सर्व सहकारी शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

## अन्यायकारक अधिभार व वाढीव विजदेयक आकारुन घरगुती विजग्राहकांची लुट : उल्हास गिराम

**•विद्युतवितरण अभियंत्यास शिवसेनेचे निवेदन**

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील विज ग्राहकांवर अन्यायकारक अधिभार व वाढीव विज रक्कम लादून हे भाजप शासित सरकार सामान्य घरगुती विज ग्राहकांची लुट करत असल्याचे निदर्शनास आल्या नंतर आज या विषयी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी



महाराष्ट्र राज्य विधुत वितरण कंपनी च्या अभियंत्यास निवेदन दिले.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (MSEDCL) यांचेकडून आकारण्यात येणाऱ्या वीज देयकांमध्ये सामान्य घरगुती ग्राहकांवर असह्य आर्थिक भार टाकण्यात येत असल्याची बाब सर्वत्र निदर्शनास येत आहे. मासिक ९६ युनिट इतका अल्प वापर असूनही देयकाची रक्कम सुमारे रुपये ▶ उर्वरित पान २ वर

## सर्वोत्तम गावरस्करांनी शून्यातून विश्व निर्माण केले : पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने

**बीड । प्रतिनिधी**

सर्वोत्तम गावरस्कर यांनी कुठलाही आधार नसतांना स्वतः चे साप्ताहिक सुरू केले. आणि त्यानंतर दैनिक करून दोन जिल्ह्यात चालवले ही गोष्ट सोपी नव्हती. मात्र हिमतीने हे दैनिक पुढं चालले. बीडची पत्रकारिता सकारात्मक झाली पाहिजे आणि बीडचे जे नाव खराब झाले आहे ते पुन्हा पूर्ववत होण्यासाठी सर्वांनी सकारात्मक गोष्टी पुढे आणल्या पाहिजेत असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. तात्यासाहेब



लहाने यांनी दैनिक सुराज्यचे संपादक सर्वोत्तम गावरस्कर यांच्या नागरी सत्कार प्रसंगी बोलताना केले. यावेळी त्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनाचे अनेक ▶ उर्वरित पान २ वर

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबिर संपन्न

**पाथर्डी । प्रतिनिधी**

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.अभय आव्हाड यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्त संकलन केंद्र,जिल्हा व रुग्णालय अहिल्यानगर ,राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विभाग,बाबुजी आव्हाड महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व राष्ट्रीय छात्र सेनेचे छात्र यांनी सहभाग घेऊन रक्तदान



केले. या शिबिराचे उद्घाटन अँड. सुरेशराव अव्हाड (उपाध्यक्ष,पार्थ विद्या प्रसारक मंडळ) यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष अभय आव्हाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बबन चौरे, डॉ.मनीषा खेडकर (आरोग्य अधिकारी उपजिल्हा ▶ उर्वरित पान २ वर

## नवगण राजुरी येथे गणेश जन्म महोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील श्री मंगलमूर्ती देवस्थान नवगण राजुरी येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी गणेश जन्म महोत्सवानिमित्त दि.२६ ऑगस्ट ते ०२ सप्टेंबर या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. मा.खा. स्व. केशरबाई क्षीरसागर आणि सोनाजीराव क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून अखंड हरिनाम सप्ताहाचा आरंभ झाला असून याही वर्षी आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या महोत्सवातील दैनिक कार्यक्रमात पहाटे चार ते पाच काकडा आरती, सकाळी दहा ते बारा गाथा भजन, दुपारी तीन ते पाच गणेश पुराण, सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ, रात्री ९ ते ११ हरिकीर्तन नंतर भजन, भारुड होणार असून यात ह. भ. प. अर्जुन महाराज मोटे पळशी, जलाल महाराज सय्यद नाशिक, मत्सेंद्र महाराज निकम नेवासा, पांडुरंग महाराज उगले परभणी, नरेंद्र महाराज गुरव मालेगाव, साध्वी वैष्णवी दिदी सरस्वती आळंदी, गोविंद महाराज गोरे यांचे हरिकीर्तन होणार ▶ उर्वरित पान २ वर

# स्थानिक आपत्तीचा निकष वगळल्याने पीक विमा कंपनीकडून 25 टक्के अग्रीम नुकसानभरपाई बंद

**सरकारच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिमगा आंदोलन ; पुर्वीप्रमाणेच ट्रेगर करण्यात यावेत : डॉ.गणेश ढवळे**

**बीड । प्रतिनिधी**

पीक विमा कंपन्यांचे दलाल झालेले राज्य सरकार शेतकऱ्यांच्या मुळावर उठले आहे. पीक विमा योजनेतून नुकसानभरपाईसाठी पात्र असलेले स्थानिक आपत्तीमुळे झालेले नुकसान, काढणीपूर्व किंवा काढणीनंतर झालेले नुकसान, पेरणी न झाल्याने झालेले नुकसान हे महत्वाचे निकषच वगळण्यात आले आहेत.यामुळे शेतकऱ्यांनी तक्रार केल्यानंतर पंचनामा करून मिळणारी २५ टक्के अग्रीम रक्कम आता मिळणार नाही. सरकारने नुकसानीची पाहणी करून पंचनामे करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या असल्या तरी स्थानिक आपत्तीचे ट्रगर रद्द केल्याने आठवडाभरात झालेल्या नुकसान ▶ उर्वरित पान २ वर




**•शासनाचा बदललेला निकष ; शेतकरी हवालदिल**

राज्य शासनाने पिक विम्याच्या संदर्भाने स्थानिक आपत्तीचा निकष बदलल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. पीक विमा म्हणजे शेतकऱ्यांचे सुरक्षा कवच समजले जात होते. पूर्वी विमा योजनेत ४ ट्रगर होते – सलग ३ आठवडे पावसाने दडी मारली आणि पिके करपली, अतिवृष्टीमुळे पिके वाहून गेली, पिके पाण्यात बुडून नासली, तक्रारीनंतर पंचनामा करून २५ टक्के अग्रिम दिले जात असे. यामुळे शेतकऱ्यांचा खर्च निघत असल्याने दिलासा मिळत असे. पण विमा कंपन्यांनी सत्ताधाऱ्यांना हाताशी धरून अतिवृष्टी व कोरडे ट्रगर वगळून फक्त पीक कंपनी हा एकमेव ट्रगर ठेवला आहे.